# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका

अंक ६ वा (जुलै ,ऑगस्ट,सप्टेंबर २०२४)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक ४२०२१३ |संपर्क : ९८६०५५२३२४/९६९९०९१२३३

Email : gharkulparivar@gmail.com I Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय

## सप्रेम नमस्कार ..

घरकुल **"आनंदयात्रा"** चा सहावा अंक आपल्यापर्यंत पोहोचवताना नेहमीप्रमाणेच मनापासून आनंद होत आहे. जुलै ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये घरकुल मध्ये घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी या अंकाच्या माध्यमातून आपल्याला माहीत होतील. हे तीनही महिने म्हणजे पाऊस आणि सणांची रेलचेल. घरकुल मध्येही पुढे येणाऱ्या गणपती उत्सव आणि दिवाळीच्या दृष्टीने कामाची लगबग होती.विशेषत जुलै आणि ऑगस्ट मध्ये शाडू मातीच्या गणपती मूर्ती बनवणे , आसन, गणपती सजावटीसाठी बॅक ड्रॉप, तोरण अशी सगळी धावपळ चालू होती. त्याच्या जोडीने दिवाळीसाठी आकाश कंदील बनवण्याचे कामही चालू होते. गणेशोत्सव संपल्यावर दिवाळीच्या कामांनी वेग घेतला.

थोडक्यात म्हणजे लगबग, धावपळ ,नेहमीचे असेंबलीचे जॉब वर्क, पाहुण्यांच्या भेटीगाठी यांनी घरकुल गजबजले होते. **"आनंदयात्रा"** या त्रैमासिकाच्या माध्यमातून या सगळ्या लगबगीत आपण सर्वजण सहभागी होता याचा खूप आनंद आहे

पुन्हा एकदा आपणाला नम्र विनंती की आपल्या सूचना आणि प्रतिक्रिया नक्की पाठवा.

**आपल्या सगळ्यांना दिवाळी आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

***

-: संपादकीय मंडळ :-

सौ. सुनिता आडके — सौ. साधना देशमुख

सौ. विद्या फडके — सौ. वल्लरी प्रधान

श्री.. नरेश महाजन — डॉ. सुचेता संकपाळ

***

# घरकुलची कहाणी



घरकुल ची कहाणी सांगता सांगता आपण आता, जागा आणि वास्तूच्या बाबतीत अखेरच्या टप्प्यात आलेलो आहोत. पिंपळगावबहुला येथे श्री.. राजेंद्र गोठींच्या वास्तुत घरकुल छान सुरू झालेलं होतं. परंतु एकूणच जागा कमी पडत असल्याने आणि दूरदृष्टीने आणखीन काही उत्तम सुविधा उपलब्ध करणे, काळानुरूप बदल करणे, विस्तार करणे आवश्यक होते, त्यामुळे गोठींच्या समोरचाच प्लॉट आपण विकत घेतला.

नंतर प्रश्न होता इमारत उभी करण्याचा. डोळ्यांसमोर फार मोठे स्वप्न होतं. अपेक्षित इमारत उभी करायची तर किमान चार-पाच कोटी तरी लागतील असा अंदाज होता. त्यासाठी कार्यकारिणीने निधी उभारण्याची धावपळ सुरू केली. अनेक कंपन्यांना भेटलो. त्यांना प्रपोजल दिले. अनेक देणगीदारांना भेटलो. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून असं ठरवलं की काही देणगीदारांकडून प्रत्येक खोलीसाठी देणगी घेऊन त्या त्या खोलीला त्यांच्या प्रियजनांची नावं द्यावीत.

त्या दृष्टीने प्रयत्न सुरू असतानाच सँन्सोनाईट कंपनीशी चर्चा सुरू झाली. परंतु त्यावेळी त्यांची देणगीची मर्यादा (सीएसआर )संपली होती. परंतु मा.श्री. मिलिंद वैद्य यांनी मार्ग काढला आणि त्या कंपनीचे वरिष्ठ मा. तेंनवाला यांच्याशी भेट घालून दिली. ते स्वतः घरकुल मध्ये आले. घरकुलची सविस्तर माहिती घेतली. घरकुल चे कामकाज पाहिले आणि म्हणाले, "बघतो काय करता येईल ते."

आणि काय आश्चर्य बघा, दुसऱ्याच दिवशी त्यांनी फोन करून घरकुल ला भरीव अर्थ सहाय्य देण्याचे मान्य केले. श्री. तेंनवाला यांच्या खाजगी ट्रस्ट मधून मिळालेल्या अर्थसहाय्यामुळे व इतर देणगीदारांनी आपल्या प्रियजनांच्या स्मृती प्रत्यर्थ दिलेल्या देणग्यांमुळे घरकुलचे स्वतःच्या इमारतीत जाण्याचे स्वप्न साकार झाले. तेंनवाला यांच्याप्रमाणेच ज्या इतर व्यक्तींनी घरकुलच्या इमारतीच्या बांधकामात सढळ हाताने मदत केली त्यामध्ये श्री.. किशोरभाई व सौ. वंदना केला (श्री. नंदलाल केला स्मरणार्थ), श्री.. सुरी नारायण (Fortune Engineering company), श्री.. राधाकिसन जी व सौ करूणाताई चांडक (स्व. कमलाबाई रामनाथ चांडक यांचे स्मरणार्थ), श्री.. मनसुखलाल खाडावाला (डॉ.जयसुखलाल मर्चंट स्मरणार्थ), श्री. प्रल्हाद व सौ ममता माशाळकर (स्व. प्रभा रानडे स्मरणार्थ),

# घरकुलची कहाणी

Lord India Pvt.Ltd यांनी देखील इमारतीच्या बांधकामात भरीव अर्थसहाय्य केले. या सर्वांनी प्रत्यक्ष इमारतीच्या बांधकामामध्ये मदत केली याशिवाय अनेकांनी या इमारतींतील मुलींना लागणाऱ्या गरजेच्या वस्तू घेण्यासाठी सुद्धा मदत केलेली आहे आणि पुन्हा एकदा "देणाऱ्याचे हात हजारो" याचा प्रत्यय आला. प्रसिद्ध आर्किटेक्ट श्री.. संजय पाटील व त्यांची कन्या अनघा पाटील ह्यांनी इमारतीचा प्लॅन तयार केला होताच आणि त्या प्लॅन प्रमाणे अतिशय दिमाखदार अशी ही वास्तू तितक्याच गतीमानतेने कॉन्ट्रॅक्टर श्री.. लोढा व त्यांचे सहकारी श्री. लाड ह्यांनी पूर्णत्वास नेली. त्यामुळे कमी वेळात ही दिमाखदार इमारत उभी झाली.

यानंतर संस्थेच्या अध्यक्षा प्रा सौ.सुनीता आडके व त्यांचे पती मा. एडवोकेट श्री. अशोक जी आडके ह्यांच्या हस्ते विधिवत वास्तुशांती करून इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ लेखक, अर्थतज्ज्ञ मा श्री..अच्युतराव गोडबोले आणि सर्वोच्च न्यायालयाचे मा अँड. मकरंद अडकर हे उपस्थित होते. अनेक हितचिंतक, देणगीदार, पालक, आणि आमच्या मुली ,मावशा, शिक्षिका.. सर्वांनी हा गोड, सुंदर सोहळा अनुभवला.

ही अतिशय देखणी, भव्य, प्रसन्न इमारत पाहून मुलींना तर खूप आनंद झाला.

घरकुलची ही कहाणी इथपर्यंत सांगितली... ती वास्तु संदर्भातली... आजवर त्यासाठी झालेल्या स्थित्यंतरांबद्दलची बद्दलची. तशी तर घरकुलच्या प्रत्येक मुलीची पूर्वाश्रमीची एक कहाणी आहे .प्रत्येक दिवसाची एक गोष्ट आहे आणि ही वाटचाल अखंड सुरूच राहील. हे सर्व सांगतांना पहिल्या दिवसापासूनचा गेल्या अठरा वर्षाचा हा अनुभव पट डोळ्यांसमोर येतोय.

पण खरंच सांगते, मी एकटी कुणीच नव्हते व अजूनही नाही. माझ्यामागे असंख्य देणगीदार आणि पालकांच्या सदिच्छा होत्या व आहेत. म्हणून माझ्या डोळ्यांदेखत ही इमारत उभी राहिली याचा आनंद मी कोणत्या शब्दात व्यक्त करू कळत नाही. स्वतःच्या हक्काच्या वास्तूचे, म्हणजे डोक्यावर चांगले छप्पर असण्याचे महत्त्व हे त्यांनाच कळेल ज्यांनी ऊन, वारा, पाऊस झेलला. म्हणूनच घरकुलच्या या वास्तूत दिवसभर आनंदाने बागडून, "गुड नाईट-शुभरात्री" म्हणत रात्री शांत झोपणाऱ्या या मुलींकडे बघून त्या अनामिक शक्तीपुढे हात आपोआपच जोडले जातात. घरकुलच्या प्रवासाची ही साठा उत्तराची कहाणी तूर्तास सुफळ संपूर्ण असे म्हटल्यास हरकत नाही परंतु पुढचा प्रवास पुढचा विस्तार ही देखील डोळ्यासमोरची स्वप्न आहेत आणि या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी कायमच समाजाच्या संवेदनशील आणि दानशूर व्यक्तींची मदत, पाठबळ लागणार आहे .

**विद्या ताई फडके**
संस्थापिका व संचालिका घरकुल परिवार संस्था

# घरकुलचे आधारस्तंभ



श्री. निशिकांत अहिरे



श्री. दिलीप पाटील

श्री. अहिरे व्यवसायाने इंजिनियर असून त्यांच्या इंजिनिअरिंग कंपनीमधील मधील स्पेअर पार्ट्स परदेशात निर्यात केले जातात.

श्री. अहिरे हे सामाजिक क्षेत्रात विशेष क्रियाशील असून शिक्षण व आरोग्य या क्षेत्रात त्यांचे योगदान मोठे आहे. श्री. निशिकांत अहिरे आणि घरकुल यांचा संबंध दहा-बारा वर्षापासून चा आहे. एखादे व्रत हाती घेतल्यावर जसे ते कसोशीने पाळले जाते त्याचप्रमाणे घरकुल मधील शिक्षक विकास कार्यक्रमात श्री. अहिरे व त्यांचे स्नेही श्री. दिलीप पाटील हे दोघेही कटिबद्ध आहेत. आजवर ही जोड गोळी घरकुलच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे अशा आधार स्तंभांमुळे घरकुल ला एक प्रकारे विश्वास मिळतो आणि पुढील वाटचालीसाठी बळ मिळते.

या जोडगोळीतील दुसरे व्यक्तिमत्व म्हणजे श्री. दिलीप पाटील. श्री. पाटील यांचा इंजीनियरिंग क्षेत्रातील अनुभव आणि वाटचाल अतिशय दैदीप्यमान अशी आहे क्रॉम्प्टन ग्रीव्हज या नामांकित कंपनीतून त्यांनी एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट व चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर म्हणून ते नुकतेच सेवानिवृत्त झाले आहे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज या कंपनीत वेगवेगळ्या पदांवर त्यांनी काम केलेले आहे आणि विविध देशांमध्ये सुद्धा ते कार्यरत होते. सीओईपी व आयआयटी मुंबई यासारख्या नामांकित शिक्षण संस्थांमधून इंजीनियरिंग मधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण त्यांनी संपादन केले आहे. श्री. अहिरे व श्री. पाटील या दोघेही घरकुलच्या वाटचालीत मोलाची भर टाकीत आहेत. आणि म्हणून श्री. अहिरे आणि श्री. पाटील हे दोघेही घरकुलचे खंबीर व भक्कम असे आधारस्तंभ आहेत.

# विश्वासू सहकारी



## श्री.मती सपना घुले (घुले मावशी)

श्री.मती सपना घुले घरकुलच्या सेक्युरिटी हेड आहेत. सगळं घरकुल त्यांना “घुले मावशी” म्हणून संबोधतात. त्या घरकुल परिवारातील अतिशय विश्वासू सहकारी आहेत.

घुले मावशी होमगार्ड मध्ये होत्या. तेथे 9 ते 10 वर्ष सेवा केल्यावर त्या घरकुलला 2013 मध्ये 'सिक्युरिटी गार्ड या पदावर रुजू झाल्यात.

मुळात 'होमगार्ड' मधील प्रशिक्षण आणि जात्याच शिस्तशिर स्वभाव यामुळे घरकुलच्या पिंपळगाव बहुल्याच्या इमारतीत जशा सुरक्षेची गरज होती तशी सुरक्षा घुले मावशीं मुळे मिळाली. बऱ्याचदा सिक्युरिटी गार्ड गेटवर स्टूल टाकून हातात दंडुका आणि पोलीसी शिट्टी गळ्यात अडकवलेला अशी आपल्या मनातील प्रतिमा असते, पण घरकुल मधल्या आमच्या घुले मावशींची प्रतिमा मात्र साफ वेगळी आहे. सहसा त्यांचा एक कान आणि डोळा गेटवर असतो आणि दुसरीकडे त्या मशीनवर शिवणकाम करत असतात. पायपुसणी, पिशव्या, एपरन शिवणे ईत्यादी प्रोडक्ट डिपार्टमेंटला हातभार लावण्याचे काम तत्परतेने करीत असतात . याशिवाय त्यांना “ग्रीनहँड” चा वरदहस्त असल्यामुळे त्यांनी लावलेली झाडे निश्चितपणे लागतातच त्यामुळे घरकुलची बाग सदाहरित आणि तरतरीत दिसण्यात घुले मावशींचा मोठा हात आहे. त्या नियमितपणे झाडांना पाणी देतात निगा राखतात. मुलींना आणि सर्व ताई मावशींना पण घुले मावशींचा धाक असतो पण तेवढ्याच त्या प्रेम पण करतात. असं हे तिखट गोड व्यक्तिमत्व. मागच्या वर्षी त्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या असल्या तरी स्वेच्छेने त्यांनी हे काम करण्याची इच्छा व्यक्त केली त्यामुळे आजही घरकुलच्या सेवेत त्या कार्यरत आहेत.

घुले मावशींनी सेवानिवृत्तीनंतरही सेवा देण्याचा निर्णय घरकुलच्या व्यवस्थापनासाठी आणि विशेषतः विद्याताईसाठी अतिशय दिलासादायक आहे.

अशा या घुले मावशी आपल्या सिक्युरिटीचं काम तर चोख करतातच पण त्याचबरोबर इतरही कामात आपलं योगदान देतात. घरकुलच्या मुली खूप भाग्यवान आहेत त्यांना घुले मावशींसारख्या मातृ हृदयी सुरक्षा रक्षिका मिळाल्यात.

# गोष्ट एकेकीची



## शिल्पा अशोक कुळकर्णी

धुळे येथील शिंदखेडा या गावातील. घरकुल मध्ये 2006 ला शिल्पा आली ती त्यावेळी घरकुल मध्ये असलेल्या मावशी (केअर टेकर) जोशी मावशींच्या संपर्कातून. या जोशी मावशी पण मूळच्या शिंदखेड्याच्या. शिल्पाचे कुटुंब अतिशय सधन, आई प्राथमिक शिक्षिका व वडील प्राध्यापक, तिचा भाऊ इंजिनियर असून चांगल्या कंपनीत नोकरी ला आहे.

शिल्पा कुटुंबात अतिशय लाडकी, शिंदखेडा ला कुलकर्णी यांचे एकत्र मोठे कुटुंब, कुटुंबात शिक्षणाचा प्रचार व प्रसार असूनही घरची शेतीवाडी असल्याने गावाकडचं वातावरण घरात त्यामुळे शिल्पाला खूप माणसांमध्ये राहण्याची सवय आणि आवडही होती.

शिल्पा घरकुल मध्ये आली तेव्हा प्रचंड हट्टी होती एरवी अबोल आणि हळू आवाजात बोलणारी शिल्पा रागावल्या वर मात्र खूप मोठ्याने ओरडणारी, मानसिक आणि शारीरिक दिव्यांग असण्याबरोबरच तिला एपिलेप्सीच्या फिट्स येतात. मात्र घरकुल मध्ये आल्यापासून तिच्या फिट्स येण्याचे चे प्रमाण खूप कमी झाले. तिची आई अगदी आवर्जून सांगते की शिल्पाचा हट्टीपणा घरकुल मध्ये आल्यापासून पाच टक्के सुद्धा शिल्लक राहिला नाही. थोडक्यात घरकुल मध्ये आल्यानंतर शिल्पाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये खूप सकारात्मक बदल झालेत. आता ती बॉलपेन असेंबलीचे जॉब वर्क उत्तम करते ,चित्रात रंग भरणे तिला खूप आवडते, तिची रंगसंगतीची जाण अतिशय छान आहे. याशिवाय शिल्पाला झाडणे, जेवण्याचे टेबल पुसण्याचे काम आवडते तसेच गाणे ऐकायलाही खूप आवडते. घरकुल मध्ये इंटर्नशिप ला येणाऱ्या विद्यार्थिनींना शिल्पा उत्तम सहकार्य करते. शिल्पा विषयी बोलताना फडके मॅडम एक प्रसंग आवर्जून सांगतात. शिल्पा घरकुल मध्ये आल्यानंतर साधारण वर्षभराने शिल्पाला फिटचा त्रास झाला तिची आई अधून मधून भेटायला यायची तशा त्या भेटण्यासाठी आल्या नीट राहते म्हणून समाधानाने घरी परत गेल्या. तेव्हा घरकुल नाशिक रोड येथे होते. शिल्पाला फिट आली, तिला लगेचच डॉक्टरांना दाखविले, त्यांनी औषधही दिले त्यामुळे लगेच तिच्या आईला कळवले नाही. पण परत पंधरा मिनिटांनी फिट आली, डॉक्टरांना फोन केला त्यांचा संपर्क झाला नाही मग मात्र रात्रभर घरकुलच्या मावश्या आणि विद्याताई तिच्या उशा पायथ्याशी बसून राहिल्या त्यादरम्यान तिला दर पंधरा मिनिटांनी फिट्स येत होत्या शेवटी पहाटे चार वाजता विद्याताईंनी तिच्या आईला कळवले आणि तिला हॉस्पिटलला ॲडमिट केले. हा प्रसंग सांगताना विद्या ताई च्या एका डोळ्यात आठवणींचे आर्त अश्रू होते तर दुसऱ्या डोळ्यात आजची शिल्पा बघताना समाधानाचे आनंदाश्रू!

मध्यंतरी घरकुल मध्ये फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन चे आयोजन केले होते त्यावेळेला शिल्पा शेतकरी झाली होती आणि त्या वेशातला डायलॉग ही तिने अगदी ठसक्यात म्हटला होता.

अशी घरकुल मधल्या एकेकीची गोष्ट म्हणजे घरकुल ने या मुलींना काय दिले ,घरकुल मध्ये आल्यानंतर या मुलींमध्ये किती सकारात्मक बदल घडून आले याचा जणू आरसाच आहे.

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जुलै 2024



गुरुपोर्णिमेनिमित्त मा. डॉ. मीनाक्षी बापये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीत होत्या.




एन.व्ही .राउत इन्स्पेक्टर चॅरिटी कमिशनर ऑफीसर नाशिक यांनी घरकुलला भेट देऊन पाहणी केली.





घरकुल मधील स्टाफ विद्यार्थिनी व हितचिंतकांचे वाढदिवस साजरे करतानाचे काही क्षण



आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढून एकादशी साजरी करण्यात आली.



संदीप पिंगळे यांनी संस्थेला भेट दिली.

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जुलै 2024



हॉटेल ट्रीट येथे BNI BLAZE Visitors 'Day च्या निमित्ताने घरकुल चा स्टॉल लावलेला होता घरकुलच्या स्टॉलला भेट देताना BNI नाशिकचे संस्थापक श्री.. विक्रम माथूर सोबत घरकुलच्या ममता माशाळकर व जयश्री. कुशारे

## ऑगस्ट 2024



७८ वा स्वातंत्र्यदिवस श्री.. निखील बस्ते सर बस्ते कुटुंबीय व श्री.. उमेशभाई राठीसर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



आज ४ ऑगस्ट रोजी घरकुलमध्ये दिपआमवस्येनिमित्त दीपपूजन करण्यात आले.





पार्कर लॉर्ड कंपनीचे USA येथील मान्यवर पदाधिकारी
Mr.Rachid Bendali - Group President EMG
Mr.Shandar Alam- Country Managing Director, Mr.Anup Deshmukh-Sales Director, India
तसेच कंपनीच्या नाशिक युनिटमधील पदाधिकाऱ्यांनी घरकुल ला भेट दिली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## ऑगस्ट 2024




रणरागिणी मराठा महिला मंडळ यांनी घरकुलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.



मराठा विद्या प्रसारक समाजच्या MSW College च्या ५० विद्यार्थ्यांनी संस्थेला भेट दिली.



Courtyard Marriott Hotel येथील स्टॉलला सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री अनिता दाते यांची भेट



घरकुल परिवार संस्था तसेच slidewell कंपनी यांच्या सयुक्त विद्यमाने बहिण भावाचा रक्षाबंधन हा सण कंपनीमध्ये साजरा झाला.

## सप्टेंबर 2024







घरकुल परिवार संस्था व भारत विकास परिषद यांच्या सयुक्त विद्यमाने होमिओपॅथी कॅम्प आयोजित करण्यात आला.

# भेटीगाठी व कार्यक्रम

## सप्टेंबर 2024










घरकुलच्या विद्यार्थिनींनी केलेल्या शाडू मातीच्या गणरायाच्या मूर्ती प्रतिष्ठापनेसाठी नेताना घरकुल परिवारातील स्नेही जन



घरकुलची विद्यार्थीनी वृंदा चंद्रात्रे हिच्या पालकांनीही घरकुलमध्ये श्री. गणरायाची आरती केली.



घरकुल कार्यकारणीची वार्षिक सभा संपन्न




बँक ऑफ इंडियाच्या 119 व्या फाउंडेशन डे निमित्ताने बँकेच्या झोनल मॅनेजर श्री.मती जयश्री. देशमुख व इतर पदाधिकाऱ्यांनी घरकुल ला भेट दिली



श्री.. कैलास रावत यांनी घरकुलला भेट दिली व त्याच्या हस्ते श्री. गणरायाची आरती केली.

## सप्टेंबर 2024



रोटरी क्लब ऑफ नासिक नॉर्थ

Rotary DIST. 3030

THE MAGIC OF ROTARY

मानपत्र

श्रीमती विद्याताई फडके

उत्तर महाराष्ट्रातील प्रौढ मानसिक दिव्यांग महिलांसाठी महिलांद्वारे संचालित पहिली निवासी संस्था 'घरकुल' यानावाने आपण आपल्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून सन २००६ साली मोठ्या परिश्रमाने स्थापन केली.

ज्यांचे पालक वार्धक्याकडे झुकलेले आहेत अथवा या महिलांचा सांभाळ करणे अशक्य आहे अशा कुटुंबाला दिलासा देत आपण या मानसिक दिव्यांग महिलांचा सांभाळ आपण अगदी घरातील सदस्याप्रमाणे करीत आहात.

नृत्य, संगीत, योगा, चित्रकला, विविध खेळ या माध्यमातून आपण या महिलांवर उपचार करीत आहात. सदर दिव्यांग महिलांना त्यांची आवड, क्षमता लक्षात घेऊन मेणबत्त्या, कापडी पिशव्या, आकाश कंदील, राख्या व इतर अनेक कलात्मक वस्तू बनविण्याचे व्यवसाय कौशल्य शिकवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण झटत आहात.

या महिलांचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी त्यांना पोषक आहार, शुद्ध पिण्याचे पाणी, आनंदी, प्रेमळ वातावरण, नियमित व्यायाम तसेच वेळोवेळी वैद्यकीय तपासणी या माध्यमातून आपण प्रयत्न करीत आहात. याच बरोबर मानसिक दिव्यांगत्व या विषयावर आपण समाज प्रबोधनात्मक व्याख्याने ही आयोजित करीत असतात.

माणुसकीचा स्तर उंचावणाऱ्या आपल्या या निस्वार्थ सेवेबद्दल रोटरी क्लब ऑफ नासिक नॉर्थ आपणांस

" व्यावसायिक सेवा पुरस्कार "

आज रविवार दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी सन्मानपुर्वक देऊन सन्मानित करीत आहे.
आपणांकडून अशीच अविरत समाजसेवा घडत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

रोटे. गीता पिंगळे
अध्यक्ष, २०२४-२५

रोटे. अगस्त्य मुनिम
सचिव, २०२४-२५

*** आवाहन ***

**-: ऑनलाईन देणगीसाठी :-**

देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट

| | |
|---|---|
| A/C Name : | Gharkul Parivar Sanstha |
| Bank Name : | Bank of India |
| Branch : | Shivaji Udyan, Nashik |
| A/C No. : | 080610110000256 |
| IFSC : | BKID0000806 |

# Visitor Review

**ऑगस्ट महिन्यात घरकुल मध्ये पुणे येथील केळकर फॅमिली ने भेट दिली घरकुलच्या विश्वस्त सारिका ताई केळकर यांच्या पुढाकाराने ही भेट घडून आली. अजिंक्य केळकर यांच्या घरकुल बद्दलच्या भावनेने घरकुल कृतज्ञ आहे...**

**Whenever I met or interacted with any mentally challenged person I felt very awkward. I didn't know how to interact with them. Coz it's difficult to be normal around them. Unconsciously i start to pity their situation. Also after hearing their life stories- it makes me feel self conscious of my own privilege which was beyond anyone's control.**
**However, gharkul was a completely different experience for me. I was pleasantly surprised to see everyone was actually 'happy'. The students were definitely, but even the support staff was happy and they felt completely at ease. It was as if they were meant to be there.**
**This I think was a real eye opener for me and would really congratulate vidya maushi to foster such an environment.**
**Gharkul completely changed my perspective about physical and mental handicap.**
**I think I would be much more at ease knowing that there exists a space like gharkul which is inviting, comfortable, respectful and most important- happy.**
**Thank you sarika for that wonderful experience**



**By Ajikya Kelkar ,Pune**

## कृतज्ञतेचा नमस्कार...

एखाद स्वप्न पूर्ण करण्याचा जेव्हा आपण मनापासून ध्यास घेतो तेव्हा ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी सगळ विश्व तुम्हाला साहाय्यभूत होत. अस म्हणतात ते खोठ नाही. घरकुल सुरु झाल्यापासुन ते आतापर्यंत अनेक कंपन्या व्यक्ति संस्था यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरूपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे १७ - १८ वर्षांचा हा प्रवास सोपा झाला. समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आमच्या मुलींना आम्हाला आनंददायी व दर्जेदार वातावरण देता आलेय यामुळे घरकुल रुढार्थाने एक संस्था न राहाता एक मोठ संयुक्त कुटुंब बनलं आणि आश्वासक वाटचाल करित आहे.
त्यासाठी भविष्यातही आपणा सर्वांची साथ सहकार्य जिव्हाळा हवा आहे. आपल्या प्रत्येकाच्या प्रति आमच्या मनातल्या भावना शब्दात मांडणे कठीण आहे. मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू. सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद व कृतज्ञतेचा नमस्कार! घरकुल आपल्या सर्वांप्रती ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे स्नेहीजनांचे घरकुलात कायम स्वागत आहे.